**निवेदन**
आपल्या प्रभागातील समस्या, दैनंदिन अडचणी, फसवणूक, अन्याय-अत्याचार, मुजोरी तसेच आपल्या मनातील सूचना, शंका, उपाय यासाठी सा. संघर्षाचा आवाज आपणास खास व्यासपीठ मिळवून देत आहे.
करा त्वरा, होऊ द्या मनातला निचरा!
संपर्क : ७२७६८७१००८

साप्ताहिक

# संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013
■ https://sangharshachaaawaz.in

■ वर्ष : १४ वे ■ अंक : ०२ रा ■ सोमवार दि.०३ ऑगस्ट ते ०९ ऑगस्ट २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने - ०४

झेन झीनं आम्हांला आमची... पान २ वर | विद्यार्थ्यांच्या रक्ताने माखलेल्या... पान ३ वर | लोकमान्य टिळकांचे विचार... पान ४ वर

# पुणे महापालिकेतील गटनेते पारदर्शक कारभाराची हमी मागत आहे; तर दुसरीकडे मा.नगरसेवक भ्रष्टाचाराची सखोल चौकशीची मागणी करत आहे

## त्यात भर म्हणून एकनाथ शिंदेची शिवसेना प्रभावी उपाययोजना बाबत आक्रोश मोर्चा काढत आहे; मग सत्ताधारी आणि पुणे महापालिकेचे आयुक्त करतात तरी काय?

### पुणेकर नागरिकांना भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक कारभाराची अपेक्षा आहे; हे विसरून चालणार नाही





**पुणे :** पुणे महानगरपालिकेच्या ३० जुलै रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत घनकचरा व्यवस्थापनाच्या नव्या कंत्राटावरून मोठा गदारोळ झाला. या विषयावर बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते काकासाहेब चव्हाण यांनी स्पष्ट केले की, महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापनासाठी कंत्राट देण्यास आमचा विरोध नाही, मात्र सदर कंत्राटाची कार्यपद्धती, नियोजनातील त्रुटी आणि कचरा व्यवस्थापनाबाबत असलेला स्पष्टतेचा अभाव यालाच आमचा विरोध आहे.

काकासाहेब चव्हाण म्हणाले की, पुणे शहरातून दररोज मोठ्या प्रमाणात कचरा संकलित केला जात असला तरी त्याच्या अंतिम विल्हेवाटीसाठी महानगरपालिकेकडे स्पष्ट, सक्षम आणि व्यवहार्य कार्यपद्धती उपलब्ध नसल्याचे दिसून येते. माझ्या प्रभाग क्रमांक ३३ मध्ये कचरा उचलला गेला तर प्रक्रिया केंद्रांमध्ये कचरा स्वीकारला जात नसल्याने अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचलेले आहेत.

.अशा परिस्थितीत केवळ कोट्यवधी रुपयांचे कंत्राट देऊन शहर स्वच्छ होणार नाही. सर्वप्रथम कचऱ्याची प्रक्रिया आणि अंतिम विल्हेवाट नेमकी कशी लावली जाणार, याचा स्पष्ट आराखडा नागरिकांसमोर आणि लोकप्रतिनिधींसमोर ठेवणे आवश्यक आहे. त्यांनी पुढे सांगितले की, या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या रिजेक्ट कचऱ्याची विल्हेवाट कशी लावली जाणार, याबाबतही कंत्राटदार किंवा प्रशासनाने कोणतीही ठोस माहिती दिलेली नाही. तसेच हे कंत्राट सुरुवातीला केवळ तीन महिन्यांसाठी देण्यात येत असून, त्यानंतर ते सुरू राहिले नाही तर या कंपनीत काम करणाऱ्या शेकडो कर्मचाऱ्यांच्या रोजगाराचा आणि त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कंत्राटदाराने शहरातील स्वच्छता व्यवस्थापनाचा संपूर्ण आराखडा, तांत्रिक क्षमता, प्रक्रिया व्यवस्था आणि कामकाजाची पद्धत याबाबत सर्व नगरसेवकांसमोर सविस्तर सादरीकरण करावे, अशी आमची मागणी आहे. मात्र या मागणीलाही प्रशासन आणि कंत्राटदाराकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. तर दुसरीकडे घनकचरा व्यवस्थापन नियम, पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ व इतर लागू कायद्यांचे उल्लंघन करून बागेचा (Garden/Horticulture) कचरा उघड्यावर मोठ्या प्रमाणात साठवून पर्यावरण व सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण केल्याबाबत व घनकचरा विभागातील होणाऱ्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्याबाबत मा.नगरसेवक अविनाश बागवे यांनी दि.२७/७/२०२६ रोजी अतिरिक्त आयुक्त (ई) यांना निवेदन दिले आहे. ते निवेदनामध्ये म्हणतात की, पुणे महानगरपालिकेच्या विविध उद्याने व रस्त्यांवरील पालापाचोळा, नारळाच्या शहाळांची/झावळ्यांची विल्हेवाट लावण्याचे काम (पान २ वर)

# पुण्याचे उपमहापौर वाडेकर आणि स्थायी समिती अध्यक्ष भिमाले यांच्याकडून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना भेट देण्यात आली




**पुणे :** पुण्यात भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मा. अजितजी डोवाल यांना प्रतिष्ठेचा 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार' केंद्रीय गृहमंत्री मा. अमितभाई शहा यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. हा सोहळा राष्ट्रसेवा, कर्तृत्व आणि प्रेरणेचा अविस्मरणीय क्षण ठरला.

कार्यक्रमानंतर सन्माननीय केंद्रीय गृहमंत्री मा. अमितभाई शहा पुढील दौऱ्यासाठी पुण्यातून रवाना होत असताना, पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी त्यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांना निरोप देण्यात आला. यावेळी गृहमंत्री मा.अमित शहा साहेब यांना डॉ. श्रीपाल सबनीस लिखित डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे पुस्तक सप्रेम भेट दिले त्यांनी ते आनंदाने स्वीकारले. तसेच पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर मा. अमितजी शहा साहेब यांना निरोप देण्यास श्रीनाथ यशवंत भिमाले अध्यक्ष - स्थायी समिती, पुणे महानगरपालिका, मा.सभागृह नेते, पुणे महानगरपालिका हेही उपस्थित होते.

यावेळी त्यांनी त्यांच्या संकल्पनेतून बाणेर येथे साकारलेल्या देशातील पहिल्या पीपीपी मॉडेल वरील कॅन्सर हॉस्पिटल संदर्भातील माहिती देणारे कॉफी टेबल बुक आदरणीय अमितभाईंना दिले. आणि या भेटीच्या निमित्ताने त्यांना पुढील दौऱ्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या. याप्रसंगी राज्याचे उपमुख्यमंत्री मा.एकनाथजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री मा.सुनेत्राताई पवार, केंद्रीय राज्यमंत्री पुण्याचे खासदार मा.मुरली अण्णा मोहोळ, भाजपा प्रदेशाध्यक्ष मा.रविंद्रजी चव्हाण, आमदार मा.सिद्धार्थ शिरोळे, महापौर मा.मंजुषाताई नागपुरे, सभागृह

नेते मा. गणेश बिडकर, मा.मंत्री मा.दिलीप कांबळे, मा.आमदार योगेश टिळेकर, नगरसेवक मा.सुनील पांडे, मा.नगरसेवक मा.दीपक पोटे, पोलीस आयुक्त मा.अमितेश कुमार, कलेक्टर मा.डुड्डी साहेब, पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक मा.संदीप सिंह साहेब इतर मान्यवर उपस्थित होते.

# संपादकीय...

## जेन झीनं आम्हांला आमची लायकी दाखवून दिली?

देशाची राजधानी दिल्लीत जंतर - मंतर आणि देशभरात सुरू असलेल्या आंदोलनात जेवढा रोष केंद्राच्या कारभारावर दिसून आला तेवढ्याच किंवा त्यापेक्षा जास्त रोषाचा सामना इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या प्रतिनिधींना करावा लागला हे नाकारून चालणार नाही. ही माध्यमांसाठी धोक्याची घंटा आहे. माध्यमांनी बातम्या दाखवल्या नाहीतरी सोशल मिडिया थांबल नाही... पत्रकारितेचं शिक्षण न घेताही न्याय काय आणि अन्याय काय याची जाण असलेल्यांनी, सोशल मिडिया एका हाताचे खेळणे असलेल्या जेन झी सोशल मीडियावर नेमके काय दाखवायचे हे माहित आहे आणि त्यांनी दाखविलेल्या प्रत्येक गोष्टीला बातमी मुल्य होते. त्यामुळे त्यांचे व्हिडीओ लाखो व्ह्युज मिळवत होत. हे लक्षात आल्यावर एसी केबिन मध्ये बसून या व्ह्युज आणि त्यावर टीआरपीचे गणित मांडणाऱ्या एसी केबिन मधील साहेबाना ही आंदोलन आपला रिच वाढवतील हे लक्षात आल्यावर त्यांनी जंतर मंतर वर धाव घेत..स्वतःला लावलेली सेन्सॉरशिप सोडत वार्तांकनाचा निर्णय घेतला. मात्र, तो पर्यंत वेळ निघून गेली होती. भविष्यात माध्यमासाठी ही धोक्याची घंटा आहे. मिडिया कधी गोदी मिडिया झाला, कळलंच नाही, प्रश्न विचारणारा आवाज, कधी हरवला कळलंच नाही. सत्तेच्या दालनात सत्य हरवू लागलं, हेडलाईनपेक्षा कौतुक अधिक झळकू लागलं. जनतेचे प्रश्न मागे पडले, वाद-विवादांचे रंगमंच पुढे सरकले. आरशासारखं सत्य दाखवणं विसरलं, सत्तेचं प्रतिबिंब दाखवण्यातच धन्य मानलं. पत्रकारितेची लेखणी जेव्हा निडर असते, तेव्हाच लोकशाही अधिक मजबूत असते. म्हणूनच अजूनही गरज आहे सत्तेची नव्हे, सत्याची बाजू घेणाऱ्या पत्रकारितेची. या पध्दतीने कित्येक पत्रकाराने समाज माध्यमातून व्यक्त झालेले पाहिले आहे. तसेच संजय सिन्हा या पत्रकाराचे खडे बोल विसरता येणार नाही ते म्हणतात की, जेन झीनं आम्हांला आमची लायकी दाखवून दिली पण या पिढीनं माझ्यासमोर आरसा धरला. हीच पिढी, जिला आम्ही अजाण, मोबाईलमध्ये डोकं खुपसून बसणारी, रिल्समध्ये रमलेली, अननुभवी म्हणून निकालात काढत आलो. मी जेन झीबद्दल बोलतो आहे. या पिढीनं कुणावरही डोळे झाकून विश्वास ठेवणं सोडून दिलंय. नि मला त्याचा आनंद आहे. स्वतःचे निर्णय ते स्वतः घेतात. त्यांचे निर्णय चुकीचे आहेत की बरोबर हे इतिहास ठरवेलच. पण त्यांनी त्यांची डोकी गहाण टाक्लेली नाहीत, हे नक्की. हेच त्याचं सर्वांत मोठं बलस्थान आहे. जंतरमंतरवर जे घडताना मी पाहिलं, त्यानं मी अंतर्बाह्य हादरून गेलो आहे. आंदोलनामुळे नाही. लोकशाहीत अशी आंदोलनं होणारच. पण मी हादरलो आहे, कारण आम्हांला तुमची काहीएक गरज नाही असं या पिढीतल्या पोरांनी मुख्यधारेतल्या माध्यमांना चोख बजावलंय. येऊच नका. आमच्या आंदोलनाचं प्रतिनिधित्व करू नका. आम्ही आमचं म्हणणं जगापुढे स्वतःच मांडू. असं त्यांचं म्हणणं आहे. तुम्ही लोकांनी पत्रकारांना नाही-नाही ती दूषणं दिलीत. कुणी गोदी मिडिया म्हटलं, कुणी प्रेस्टिट्यूट म्हटलं, कुणी पत्लकार म्हटलं. कुणी लिब्रांडू म्हणालं. कुणी वामपंथी म्हटलं. आम्ही ऐकून घेतलं. ऐकून घेणं भागही होतं. तथ्य होतंच त्यातही. पण जेन झी तुमच्यामाझ्यापुढे दोन पावलं आहे. ते म्हणले, नाही ना विश्वास? बहिष्कार टाका. कुण्या चॅनलसमोर हात जोडले नाहीत, संपादकांना फोन लावले नाहीत, कुणा वार्ताहराला एक्स्क्लूजिव मुलाखत दिली नाही. त्यांनी आपला मोबाईल काढला नि स्वतःच पत्रकारिता करायला सुरुवात केली. खरं सांगू? जे बघितलं गेल्या काही दिवसांत, त्यानं मी शरमून गेलो. कोट्यवधी रुपयांचे कॅमेरे असतात आमच्याकडे, ओबी व्हॅन्स घेऊन फिरतो आम्ही. सॅटेलाइट अपलिंकसाठी कोट्यवधी रुपये खरचतो. आणि इथे - ही पोरंपोरी पाच इंचाच्या स्क्रीनचा मोबाईल घेऊन अशी पत्रकारिता करत होती, की भल्या भल्या न्यूजरूम्सनी त्यांच्या पायाशी बसून धडे घ्यावेत. एका व्हिडिओत पळणार्या तरुणाला एक जवान पायात पाय अडकून पाडताना दिसतो. कॅमेर्यानं ते टिपलं आहे. दुसर्या व्हिडिओत एक पोलीस एका तरुणीच्या पार्श्वभागात काठी घुसवताना दिसतो आहे. कॅमेरा तेही अचूक टिपतो. कुणी किंचाळून काहीही कॉमेंट्री करत नाही. नुसती चित्रं. पण त्यातून जे दिसतं, ते बघून कुठलाही संवेदनशील माणूस हादरून गेल्यावाचून राहणार नाही. एका व्हिडिओत पोलीस स्वतःच गाडीच्या काचा फोडताना दिसतो. कॅमेर्यात हे टिपलं गेलं नसतं, तर उद्या ही तोडफोड आंदोलकांनी केली असंच पसरवलं गेलं असतं. एक लहानसा मोबाईल कॅमेरा. सगळ्या खोट्यानाट्या नरेटिवला आव्हान देतो. यालाच पत्रकारिता म्हणतात. स्टुडिओत बसून दहा लोकांवर आरडाओरडा करण्याला पत्रकारिता नाही म्हणत. सत्ताधार्यांना जे लपवायचं असतं, ते सत्य - तो क्षण अचूक टिपणं म्हणजे पत्रकारिता. इतिहासाच्या पानांतून सत्तेला जे फाडून टाकायचं असतं, ते नोंदून ठेवणं म्हणजे पत्रकारिता. या पोरांना कॅमेरा नीट समजतो. फ्रेमिंग समजतं. ॲंगल समजतो, टायमिंग, एडिटिंग सगळं नीट समजतं. बघताना वाटत होतं, हे काम कुण्या जाणकार, अनुभवी पत्रकारांच्या चमूचं आहे. कुणी शिकवली या पोरांना पत्रकारिता? कुणीच नाही. ते तिथे पत्रकारिता जगले. देशात खरंच माध्यमं स्वायत्त, स्वतंत्र असती, तर या पोरांना दुसर्याच दिवशी बोलावून कामं करण्यासाठी आमंत्रणं आली असती. अशा वार्ताहरांची आम्हांला गरज आहे असं म्हणत त्यांच्यासाठी पायघड्या घातल्या गेल्या असत्या. पण तसं झालं नाही. वाईट वाटतं. कारण वृत्तवाहिन्यांना आता वार्ताहर नकोच आहेत. त्यांना तयार मजकूर वाचून दाखवणारे, पोपटपंची करणारे लोक हवेत. पाळीव, आज्ञाधारक ॲंकर्स हवेत. पत्रकारपरिषदांमधून हसतमुख चेहर्यानं वावरणारे चिकणे चेहरे हवेत. प्रश्न विचारण्याआधी मालकाच्या तोंडाकडे बघून परवानगी घेणारे लोक हवेत यांना. म्हणूनच लोकांचा विश्वास उडाला आहे. जेन झी, आमचा सलाम स्वीकारा. पत्रकारिता कॅमेर्यानं नाही, पाठीचा ताठ कणा वापरून करतात, याची आठवण तुम्ही आम्हांला करून दिलीत. ज्या दिवशी कणा गहाण पडतो, त्या दिवशी कॅमेरा म्हणजे निव्वळ एक यंत्र म्हणून उरतं. पत्रकार पत्रकार उरत नाही. सत्ताधार्यांचा भाट होतो.


साप्ताहिक संघर्षाचा आवाज मालक – यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग – सी – २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे – ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात
Email : sangharshachaawaz22@gmail.com
Email : sangharshachaawaz@rediffmail.com
Mob. : 7276871008 / 9665487134



## सिगोलवाद सुत्त

मला उपलब्ध वाङमयाद्वारे धर्मासंबंधी जे ज्ञान प्राप्त झाले. त्याचे सर्वासाठी विवरण करावे असे वाटले आणि धम्मप्रचाराच्या कामास सुरूवात करावी असे वाटले. विचार मनाना भावला लिखाणाचे अंग नोकरीत असल्यापासून आहे, धम्मासंबंधी मला पटलेल्या लहान विषयावर आधारित बाबी पुस्तकरूपाने समाजास देणे ही योजना आहे. भगवंताच्या सुत्तातील अर्थ मला समजला तसा मी मांडला आहे, अर्थात माझ्या आचरणाला धर्म मी सांगतोय. मला लेखक व्हायचे नाही. धम्माच्या आचरणाद्वारा प्रचार करावयाचा आहे. त्यासाठी माझ्या बुध्दीनुसार, आकलनानुसार मी प्रयत्न करण्याचे धाडस केले आहे व ते पुढेही चालू ठेवणार आहे. प्रोत्साहन मिळाल्यास माझाही हुरूप वाढेल व पुढील काम विनाविलंबाने करीन.

जयभीम!

**उत्तमराव सोनवणे**

**मागील अंकावरून**

६) त्याच्याबरोबर लग्नासाठी त्याला कोणतीही स्त्री पसंत करित नाही कारण तो तिाा योग्यप्रकारे उदरनिर्वाह करू शकत नाही.

ड) हे तरूण गृहस्था, हे सहा दुष्परिणाम आळसी लोकामध्ये असतात. तो कोणतेही काम करित नाही. तो काम न करण्याची अशी कारणे देतो.

१) आज खूप थंडी आहे.

२) आज अत्यंत उष्णता आहे.

३) आज रात्र झालीय, खूप उशीर झाला आहे.

४) सूर्य उक्षवायला बराच अवधी आहे खूपच लवकर का उठावे.

५) मला आता बरीच भूक लागली आहे.

६) अधिक जेवल्यामुळे थोडी वामकुक्षी घ्यावी.

अशाप्रकारे अनेक कारणे सांगून तो कोणतेही काम करित नाही. नविन धन मिळवित नाही. अशामुळे जी धूसंपत्ती आहे ती तो हळू हळू घालवून बसतो.

भगवान बुध्दांनी हे सांगितल्यावर ते पुन्हा म्हणाले कांही खाण्यापिण्याचे दोस्त असतात जो पर्यंत तुझ्याकडून कांही तरी मिळते तोपर्यंतच तुला तुझ्यासमोर मित्र– म्हणतील; ते सर्व लाभार्थी आहेत.

सूर्योदयापर्यंत झोपने, पती अुवा पत्नीचा विश्वासघात करणे, रागीट स्वभाव,

**क्रमश:**

## पुणे महापालिकेतील गटनेते पारदर्शक कारभाराची हमी मागत आहे;...

**(पान १ वरून)** सन २०२१ मध्ये युनिटी ग्रीन सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेस देण्यात आले होते. सदर प्रकल्पाबाबत आम्ही प्रत्यक्ष जागेची केलेली पाहणी व संदर्भ क्र. २ नुसार मनपाकडून प्राप्त झालेली लेखी कागदपत्रे यावरून पुणे महानगरपालिकेची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक करून मनपाचे व कररूपी पुणेकरांचे कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार रूपी लूट ठेकेदार व काही संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमताने केल्याचे निदर्शनास येत आहे. या प्रकरणात काही गंभीर बाबी आढळून आल्या आहेत त्यामध्ये १. बंद असलेल्या प्रकल्पांचीही बिले काढून कोट्यवधी रुपयांची रक्कम ठेकेदारास अदा करण्यात आली आहे. (१० पैकी ८ ठिकाणे बंद आहेत)

२. ठेकेदार व मनपा मधील करारातील अनेक अटी व शर्तींचे उल्लंघन करण्यात आले असून संबंधित ठेकेदाराविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. तसे लेखी उत्तर प्रशासनाने दिले आहे.

३. सामान्य नागरिकांच्या जीवाशी खेळ करत धोकादायक स्थितीत असलेल्या व क्रमांकपाटी (Number Plate) नसलेल्या वाहनांमधून कचऱ्याची वाहतूक केली जात आहे. कार्यादेश अट क्र. ७ नुसार गाड्यांचे फिटनेस टेस्ट करणे बंधनकारक असताना प्रशासन दुर्लक्ष करत आहे.

४. एका वाहनातील कचरा दोन, तीन वेगवेगळ्या ठिकाणी दाखवून त्याचे तिप्पट बिलिंग करण्यात येत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे. करारनाम्यातील आर्टिकल VI६.२ a (i) अटीनुसार इलेक्ट्रिक वेटिंग मशीन आवश्यक असताना हाताने खोटे वजनाचे पावती तयार केले जात आहे.

५. केवळ कचरा उचलणे आणि तो विविध ठिकाणी साठवून कोणतीही प्रक्रिया न करता नंतर जाळण्यात येत असून, पर्यावरणाची हानी (पर्यावरण अधिनियम १९८६, MPCB चे नियम १९८१ व MSW नियम २०१६ चे उल्लंघन केली जात आहे. या मोबदल्यात कचऱ्यावर पूर्ण प्रक्रिया केल्याचे भासवून पुणे महानगरपालिकेकडून कोट्यवधी रुपयांची रक्कम पूर्ण टिपिंग की अदा करण्यात आली आहे.

६. महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तसेच पर्यावरण संरक्षणासंबंधीच्या नियमांचे सर्रास उल्लंघन करून कामकाज करण्यात येत आहे. (MPCB act 29 of 1986 now 2026)

७. संबंधित ठेकेदाराकडे कार्यरत कर्मचाऱ्यांना कुठलेही युनिफॉर्म, सुरक्षा साधने, काहीच नाही. तसेच कामगार कायद्यानुसार पीएफ (PF), ईएसआयसी (ESIC), वैद्यकीय सुविधा व इतर वैधानिक लाभ देण्यात येत नसल्याचे दिसून येते. यासंबंधीची कोणतीही माहिती प्रशासनाकडे उपलब्ध नाही. (१९७० चे कंत्राटी कामगार नियमन व निर्मूलन अधिनियम १९८५ चे वर्क्स कॉंट्रॅक्ट ॲक्ट, महाराष्ट्र किमान वेतन कायदा व वर्क ऑर्डर मधील १४, १५, १६ नुसार )

८. संबंधित ठेकेदाराकडे किती ठिकाणचे प्रकल्प कार्यरत आहेत, किती बंद आहेत, कोणत्या प्रकल्पासाठी किती रक्कम अदा करण्यात आली आहे, किती ठिकाणी किती कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते याची स्पष्ट माहिती प्रशासनाकडे उपलब्ध नसल्याचे दिसून येते. किंबहुना मुद्दाम तशी व्यवस्था प्रशासनाकडून भष्टाचारासाठी ठेवण्यात आल्याचे दिसते. या प्रकारे त्यांनी एकूण ११ मुद्दे गंभीर उपस्थित केले आहे. तर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने दि.३०/७/२०२६ रोजी पुणे महापालिका मुख्य प्रवेशव्दारावर चढून आक्रोश आंदोलन केले. आणि ज्यांना आतमध्ये येता आले त्यांनी पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीच्या पायऱ्यावर बसून घोषणा बाजी करत आपले म्हणने मांडले. ते म्हणतात की, पुणे महानगरपालिकेचा दिवसेंदिवस गलथान, निष्क्रिय कारभार, सार्वजनिक निधीचा परिणामकारक वापर होत नसल्याबाबत तसेच विविध गंभीर प्रशासकीय त्रुटींवर तातडीने भूमिका घेऊन प्रभावी उपाययोजना करण्याबाबत शिवसेना पुणे शहराच्या वतीने पुणे महानगरपालिकेच्या कारभाराविरोधात करण्यात आलेल्या जनआंदोलनाव्दारे पुणेकरांच्या तीव्र भावना व्यक्त करण्यात आल्या. शहरातील विकासकामांचा दर्जा, मूलभूत नागरी सुविधा, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, प्रशासनाची कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व या सर्वच बाबींमध्ये सातत्याने होत असलेली घसरण अत्यंत चिंताजनक असून, पुणेकरांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

पुणेकरांकडून नियमितपणे कर आकारला जात असताना त्याच्या बदल्यात दर्जेदार सेवा, सुरक्षित पायाभूत सुविधा आणि उत्तरदायी प्रशासन मिळणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात महानगरपालिकेचा कारभार अत्यंत निष्क्रिय, विस्कळीत आणि लोकाभिमुखतेपासून दूर गेल्याचे सातत्याने दिसून येत आहे. त्या अनुषंगाने पुढील बाबींवर आपण वैयक्तिक लक्ष घालून तातडीने ठोस भूमिका घेणे अत्यावश्यक आहे. म्हणून त्यांनी काही प्रमुख मुद्दे मांडले त्यामध्ये १) आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेसाठी विकसित करण्यात आलेल्या सायकल ट्रॅक व रस्त्यांवर पहिल्याच पावसात खड्डे पडून कोट्यवधी रूपयांच्या विकास कामांच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

२) घनकचरा व्यवस्थापनाचा टेंडर ४०० कोटींवरून ७०० कोटींवर वाढवूनही शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचत असन, पुणेकरांच्या आरोग्याशी खेळ होत आहे. टेंडरची रक्कम जवळपास दुप्पट करण्यामागील कारणांची चौकशी करून संबंधित कंपनीचे टेंडर तात्काळ रद्द करण्यात यावे.

३) शहरातील विविध भागांमध्ये दूषित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

४) घनकचरा व्यवस्थापनावर मोठ्या प्रमाणात खर्च होत असतानाही शहरात कचऱ्याचे ढीग आणि अस्वच्छतेचे चित्र कायम आहे.

५) महाालिकेच्या ताब्यातील एलईडी प्रकाशदिवे चोरीस जाणे ही अत्यंत गंभीर प्रशासकीय बाब असून, सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षेबाबत मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत.

६) शिक्षण विभागातील महत्वाच्या फाईली चोरीस जाण्याची घटना ही अभिलेख व्यवस्थापन व प्रशासकीय नियंत्रणातील गंभीर त्रुटी दर्शविते. यासह एकूण १४ मुद्दे उपस्थित करून त्यांनी या मागण्या केल्या आहेत. १) प्रत्येक विभागाच्या कामकाजाचे तातडीने पुनरावलोकन करून त्रुटी दुर करण्यासाठी कालबध्द कृती आराखडा जाहीर करावा.

२) नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित सर्व प्रलंबित प्रश्नांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे.

३) विकासकामांमध्ये गुणवत्ता, पादरर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी प्रभावी यंत्रणा कार्यान्वित करावी.

४) घनकचरा विभागातील सेवामुक्त करण्यात आलेल्या १५० कंत्राटी कामगारांच्या प्रश्नावर मानवी आणि न्याय्य दृष्टिकोणातून तातडीने निर्णय घ्यावा.

५) पीएमपीएमएलमधील पदोन्नती प्रक्रियेबाबत निर्माण झालेला संभ्रम दूर करून वस्तुनिष्ठ भूमिका जाहीर करावी.

६) सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र व प्रभावी नियंत्रण प्रणाली उभारावी.

७) शिवसेनेच्या जनआक्रोश मोर्च्यानंतर बैठक घेण्याचे आश्वासन देऊनही महापालिकेने आजपर्यंत कोणतीही बैठक घेतली नाही. दिलेल्या आश्वासनाचा भंग करण्याऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

८) पावसाळ्यापूर्वीच्या कामांची माहिती मागविल्यानंतर महापालिकेने माहिती उपलब्ध नाही असा लेखी खुलासा दिला. हा गंभीर प्रशासकीय निष्काळजीपणा असून संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करण्यात यावी. यावर पुणे महापालिकेचे सत्ताधारी आणि आयुक्त नवल किशोर राम कशापध्दतीने या अडचणी सोडवतात. की, अजुन जटील करतात. हे लवकरच समोर येईल. एवढे मात्र सत्य आहे की, अनागोंदी कारभार मोठ्या प्रमाणात चालू आहे. असे या सर्वांच्या निवेदन, मागण्या, आंदोलन, मोर्चे यावरून दिसून येते. तरीही सत्ताधारी आणि प्रशासन प्रमुख सर्व काही व्यवस्थित आहे असेच दाखविण्याचा प्रयत्न करतात. पुणेकर नागरिकांना भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक कारभाराची अपेक्षा आहे. हे विसरून चालणार नाही.

# विद्यार्थ्यांच्या रक्ताने माखलेल्या हातांनी लोकमान्य टिळक पुरस्कार देण्यास शहर काँग्रेसचा विरोध

**पुणे :** दिल्ली येथील जतंर-मंतर मध्ये झालेले विद्यार्थ्यांचे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी केंद्र सरकारने लाठी हल्ला आश्रू गॅस व पॅलेट गनचा वापर करून अनेक विद्यार्थ्यांना जखमी केले. अशा विद्यार्थ्यांवर हल्ला करून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे हात विद्यार्थ्यांच्या रक्ताने भरले आहेत. लोकमान्य टिळक ट्रस्टच्या वतीने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना लोकमान्य टिळक पुरस्कार केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते देण्याचे ठरविले होते. विद्यार्थ्यांच्या रक्ताने हात माखलेल्या अमित शहा यांच्या हस्ते लोकमान्य टिळक पुरस्कार देणे म्हणजे लोकमान्यांचा अपमान आहे. त्यामुळे पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने त्यांच्या पुणे भेटीच्या वेळेस निषेध करण्याचा निर्णय घेतला. पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने आंदोलन करण्यासाठी पोलीसांना रितसर परवानगी मागितली होती परंतु सुरुवातीला पोलीसांनी परवानगी नाकारली काँग्रेस पक्षाने आंदोलनाचा आग्रह धरल्यामुळे कार्यक्रमाच्या १ कि. मी. च्या परिसरामध्ये आंदोलन करण्याची परवानगी पोलीसांनी दिली.

''हुकूमशहा अमित शहा गो बॅक'', ''अमित शहा यांचा धिक्कार असो'', ''अदानीला पायघड्या विद्यार्थ्यांना बेड्या'' असे अनेक घोषणांचे फलक घेऊन काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने निर्देशने केली. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप म्हणाले की, ''जतंर - मंतर येथे अंहिसेच्या मार्गाने विद्यार्थी आंदोलन करीत असताना त्यांच्यावर



अमानुषपणे लाठीहल्ला, अश्रू गॅस व पॅलेट गनचा वापर करून विद्यार्थ्यांना जखमी केले आणि हे आदेश केंद्रिय गृहमंत्री असलेले अमित शहा यांच्या निगरानीखाली झाले. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांवर झालेल्या हल्लाला जाबाबदार असलेले अमित शहा यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी केली. संसदेत सुध्दा या विषयावर अमित शहांनी खुलासा केला नाही तर संसदेतून पळ देखील काढला. केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांचे हात विद्यार्थ्यांच्या रक्ताने भरलेले असताना लोकमान्य टिळक यांच्या नावाचा पुरस्कार देण्यासाठी पुण्यासारख्या सुसंस्कृत शहरामध्ये ज्या शहराने या देशाला दिशा देणारे नेते घडविले अशा पुण्यनगरीमध्ये अमित शहा यांचा निषेध करणे हे आमचे कर्तव्य आहे. या भावनेतून आम्ही केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधात लोकशाही मार्गाने आंदोलन करीत आहोत.''

यानंतर पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी म्हणाल्या की, ''हुकूमशहा अमित शहा पुण्यामध्ये आलेले असताना विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आंदोलन करणे हा आम्हाला संविधानाद्वारे मिळालेला अधिकार आहे. मुलींवर लाठीचार्ज करणे व त्यांचा विनयभंग करणारे प्रकार हे अतिशय निदंनीय आहे. 'बेटी बचाव - बेटी पढा ओ' म्हणणारे अमित शहा यांच्या आंदेशाने मात्र महिला व मुलींवर दिल्ली पोलीसांनी हल्ला केला. त्यामुळे अमित शहाने नैतिक जबाबदारी स्विकारून राजीनामा द्यावा.'' यावेळी पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप, पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी काँग्रेस पक्षाचे पुणे मनपा गटनेते रामचंद्र उर्फ चंदू कदम व इतर पदाधिकारी यांना पोलीसांनी ताब्यात घेतले.

सदर आंदोलनात पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष लहुअण्णा निवंगुणे, नगरसेवक अरविंद शिंदे, अविनाश साळवे, रफिक शेख, साहिल केदारी, विशाल मलके, अश्विनी लांडगे, दिपाली डोख, सुनिल शिंदे, गोपाळ तिवारी, सुनिल मलके, चंद्रशेखर कपोते, अजित दरेकर, सचिन आडेकर, मेहबुब नदाफ, राजेंद्र शिरसाट, शानी नौशाद, स्वाती शिंदे, अभिजीत गोरे, बाळासाहेब अमराळे, उस्मान तांबोळी, चेतन आगरवाल, लतेंद्र भिंगारे, लता राजगुरू, द. स. पोळेकर, हनुमंत पवार, भाऊसाहेब आजबे, सुरेश कांबळे, रमेश सोनकांबळे, विशाल जाधव, शाबीर खान, सतिश पवार, भरत सुराणा, निलेश बोराटे,

संदिप कुदळे, किशोर मारणे, राहुल वंजारी, सुरेश चौधरी, सादिक कुरेशी, दिपक ओव्हाळ, कृष्णा सोनकांबळे, अर्चना शहा, सिमा सावंत, अनिता मकवाणी, संतोष सुपेकर, चेतन पडवळ, आसिफ शेख, प्रिया चेरूकुऱ्री, प्राजक्ता जाधव, मिलिंद पोकळे, आबा जगताप, अन्वर शेख, चैतन्य पुरंदरे, गुलामहुसेन खान, मजहर मणियार, आसिफ शेख, प्रथमेश आबनावे, अकबर शेख, फिरोज शेख, वैभव डांगमाळी, संदिप मोकाटे, पुष्कर आबनावे, यासीन शेख, दत्ता जाधव, सुरेश मते, अजय खुडे, सुनिल पंडित, अविनाश अडसुळ, विक्की खन्ना, अवधुत मते, गणेश गुगळे, देविदास लोणकर, दादाश्री कामठे, रामविलास माहेश्वरी, शिवाजी सोनार, अण्णा गोसावी, पांडुरंग गायकवाड आदींसह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते या आंदोलनास उपस्थित होते.

---

## अमित शहा पुणे दौऱ्यावर असताना काळे झेंडे दाखवत वंचित बहुजन आघाडीचे आंदोलन




**पुणे :** दिल्ली येथील जंतर-मंतर येथे शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या आदेशाने अमानुष लाठीमार करण्यात आला. खिळे लावलेल्या लाठ्यांचा वापर करण्यात आला. पॅलेट गनचा वापर करण्यात आला. १५० हून अधिक विद्यार्थी दवाखान्यात दाखल झाले. महिला व अल्पवयीन मुलांनाही अमानुष मारहाण करण्यात आली. याला सर्वस्वी जबाबदार अमित शहा आहेत. ते पुण्याच्या दौऱ्यावर असताना त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत अमित शहा गो बॅक नारे देत वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जाहीर निषेध आंदोलन करण्यात आले. पुणे हे विद्येचे माहेरघर आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी शांततेत केलेल्या आंदोलनाला हिंसक वळण देणाऱ्या दिल्ली पोलीस आणि त्यांचा पाठीराखा यांनी नैतिक जबाबदारी घेवून राजीनामा देणे गरजेचे असताना त्याकडे दुर्लक्ष करून विद्येचे माहेरघर पुण्यनगरीत भारताचे गृहमंत्री अमित शहा आले असता त्यांना काळे झेंडे दाखविण्यात आले. यावेळी मार्केट यार्ड पोलिसांनी ॲड.अरविंद तायडे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीच्या सुमारे ४० ते ५० कार्यकर्त्यांना ताब्यात घेऊन मार्केट यार्ड पोलीस ठाण्यात नेले. यावेळी आंदोलन कर्त्यांनी भाजपच्या कृत्यांचा निषेध केला, तसेच पोलिस यंत्रणेचा बळाचा वापर करून आंदोलने दडपण्याचे काम भाजप करत आहे. असे शहराध्यक्ष ॲड.अरविंद तायडे यांनी सांगितले.

---

## आधुनिक गुन्हेगारीविरोधात समाजात जनजागृतीची नितांत गरज – विशेष पोलीस महानिरीक्षक ज्योतिप्रिया सिंग

**पुणे :** तंत्रज्ञान जितक्या वेगाने विकसित होत आहे, तितक्याच वेगाने गुन्हेगारीचे स्वरूपही बदलत आहे. पारंपरिक चोरी, दरोडे यांसारख्या गुन्ह्यांची जागा आता ऑनलाइन फसवणूक, डिजिटल आर्थिक गुन्हे आणि सायबर हल्ल्यांनी घेतली आहे. सर्वसामान्य नागरिकांमध्ये सायबर गुन्ह्यांविषयी पुरेशी माहिती आणि जागरूकता नसल्याने अशा गुन्ह्यांना खतपाणी मिळत आहे. त्यामुळे केवळ पोलीस यंत्रणाच नव्हे, तर समाजातील प्रत्येक घटकाला सायबर सुरक्षेबाबत जागरूक करणे आवश्यक असून, इन्व्हेस्टिगेशन मास्टरक्लास सारख्या प्रशिक्षण कार्यशाळा देशभरात आयोजित होणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन ज्योतिप्रिया सिंग, IPS, विशेष पोलीस महानिरीक्षक (Spl. IGP), अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्स (ANTF), महाराष्ट्र यांनी केले. ट्रान्सेंडेंटल टेक्नॉलॉजीज आणि तंत्रज्ञान विभाग - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने, व पुनीत बालन ग्रुपच्या सहकार्याने पुणे विद्यापीठाच्या जिऑलॉजी विभागात आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय 'इन्व्हेस्टिगेशन मास्टरक्लास' प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. आगामी काळात अशा कार्यशाळांचे राष्ट्रीय स्तरावर विविध शहरांमध्ये आयोजन करण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.




यावेळी श्रीकांत पाठक, IPS, विशेष पोलीस महानिरीक्षक (Spl. IGP), आर्थिक गुन्हे शाखा (EOW), गुन्हे अन्वेषण विभाग (CID), पुणे, अरविंद साळवे, IPS, पोलीस उपमहानिरीक्षक (DIG), दहशतवादविरोधी पथक (ATS), महाराष्ट्र राज्य, शिवछत्रपती पुरस्कार विजेते डॉ. अरुण दातार, संजय शर्मा, द्वितीय कमांडंट, सीमा सुरक्षा बल (BSF) गृह मंत्रालय, भारत सरकार, ट्रान्सेंडेंटल टेक्नॉलॉजीजचे प्रमुख डॉ. केतन अत्रे यांच्यासह विविध पोलीस अधिकारी, सरकारी विभागांचे प्रतिनिधी आणि मान्यवर उपस्थित होते.

आपल्या भाषणात ज्योतिप्रिया सिंग म्हणाल्या, सायबर गुन्हे केवळ आर्थिक नुकसान करत नाहीत, तर पीडित व्यक्तीला मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागते. अनेक वेळा त्याचे गंभीर परिणाम होऊन व्यक्तीचे आयुष्य उद्ध्वस्त होते. सायबर गुन्ह्यांमध्ये माणसाचे संपूर्ण आयुष्य विस्कळीत करण्याची क्षमता आहे. त्यामुळे वेळेत जनजागृती आणि योग्य प्रशिक्षण हेच या गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्याचे सर्वोत्तम साधन आहे.

श्रीकांत पाठक म्हणाले, गेल्या काही वर्षांत गुन्हेगारांनी गुन्हे करण्याच्या पद्धती पूर्णपणे बदलल्या आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि सायबर गुन्हे केले जात आहेत. सर्वसामान्य नागरिकांमध्ये सायबर गुन्ह्यांविषयी पुरेशी माहिती नसणे हे पोलीस यंत्रणेसमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे पोलिसांसोबतच नागरिकांनीही अशा प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. अरविंद साळवे यांनी सांगितले की, दहशतवादी कारवायांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. त्यामुळे सायबर सुरक्षा आणि डिजिटल तपास याबाबतचे प्रशिक्षण दहशतवादविरोधी पथकासाठीही अत्यंत महत्त्वाचे असून, त्याचा राष्ट्रीय सुरक्षेसाठी निश्चितच फायदा होईल.

संजय शर्मा म्हणाले, सायबर गुन्ह्यांविषयी समाजात सातत्याने जनजागृती व्हावी यासाठी अशा कार्यशाळा देशातील विविध शहरांमध्ये आयोजित होणे गरजेचे आहे. नागरिक जागरूक झाले तर सायबर गुन्ह्यांचे प्रमाण निश्चितच कमी होऊ शकते.

प्रास्ताविकात डॉ. केतन अत्रे यांनी सांगितले की, इन्व्हेस्टिगेशन मास्टरक्लास हा उपक्रम लवकरच महाराष्ट्राबाहेरील राज्यांमध्येही राबविण्यात येणार आहे. या कार्यशाळांचा लाभ केवळ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनाच नव्हे, तर सरकारी अधिकारी, कायदा अंमलबजावणी यंत्रणा यांनाही होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमित त्रिभुवन यांनी केले. यावेळी इन्व्हेस्टिगेशन मास्टरक्लास या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यशाळेत सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थींना सहभाग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मनीषा सोमण यांच्या नृत्य शारदा कथ्थक कला मंदिरच्या विद्यार्थिनींनी गणेश वंदना सादर केली. तसेच लोकमाता अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त विशेष कथ्थक नृत्याविष्कार सादर करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

# लोकमान्य टिळकांचे विचार आजही राष्ट्राला दिशा देणारे; अजित डोवाल यांचे राष्ट्रसेवेतील योगदान प्रेरणादायी- केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

## अजित डोवाल यांचा सन्मान हा राष्ट्रसेवा, राष्ट्रवाद आणि समर्पणाचा गौरव – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




**पुणे :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा देत राष्ट्रवाद, शिक्षण, पत्रकारिता आणि सामाजिक जागृतीचा भक्कम पाया रचला. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच हा त्यांचा विचार आजही प्रत्येक भारतीयाला प्रेरणा देत असून विकसित आणि सक्षम भारताच्या निर्मितीसाठी मार्गदर्शक ठरत आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.

लोकमान्य टिळक यांच्या १०६ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित समारंभात राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना प्रतिष्ठेचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार तथा पुरस्काराचे मानकरी अजित डोवाल, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माजी मंत्री रवींद्र चव्हाण, टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक, डॉ. गीताली टिळक, डॉ. प्रणिती टिळक आदी उपस्थित होते.

अमित शाह म्हणाले, लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यलढ्याला जनआंदोलनाचे स्वरूप देत सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सवांच्या माध्यमातून सांस्कृतिक राष्ट्रवादाची भावना जनमानसात रुजविली. 'केसरी' आणि 'द मराठा' या वृत्तपत्रांद्वारे निर्भीड पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला, तर राष्ट्रीय शिक्षणाच्या माध्यमातून देशभक्त नागरिक घडविण्याचे ऐतिहासिक कार्य केले.

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्या कार्याचा गौरव करतांना श्री. शाह म्हणाले, देशाच्या अंतर्गत व बाह्य सुरक्षेला बळकटी देण्यात त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. गुप्तचर यंत्रणेत अनेक आव्हानात्मक मोहिमा यशस्वीपणे पूर्ण करत त्यांनी राष्ट्रसेवेचा आदर्श निर्माण केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताची सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि निर्णायक बनविण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून, राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित अनेक धोरणात्मक निर्णयांच्या अंमलबजावणीत त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी त्यांची झालेली निवड अत्यंत योग्य असून त्यांच्या कार्यातून देशातील तरुणांना राष्ट्रसेवेची प्रेरणा मिळेल, असा विश्वासही शाह यांनी व्यक्त केला.

### राष्ट्रसेवा, राष्ट्रवाद आणि समर्पणाचा गौरव- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी अजित डोवाल यांची झालेली निवड ही राष्ट्रसेवा, राष्ट्रवाद आणि समर्पणाचा गौरव आहे. २०१४ पासून राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून त्यांनी भारताच्या सुरक्षा धोरणाला नवे परिमाण दिले. त्यांच्या 'प्रोक्टिव्ह डिटरन्स' च्या संकल्पनेमुळे भारताची सुरक्षा रणनीती अधिक प्रभावी झाली आहे. भारत आता केवळ हल्ले सहन करणारा देश नसून आवश्यकतेनुसार ठोस प्रत्युत्तर देण्याची क्षमता असलेले सामर्थ्यवान राष्ट्र बनल्याचे त्यांनी नमूद केले.

लोकमान्य टिळकांनी १८५७ नंतर भारतीय समाजात स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना चेतवून राष्ट्रवादाला नवी दिशा दिली, ते भारतीय राष्ट्रवादाचे जनक होते. टिळकांनी इंग्रजी साम्राज्याच्या काळात भारतीयांची मानसिकता बदलत त्यांच्या मनात देशभक्तीच्या भावनेचे रोपण केले. सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंतीच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणत राष्ट्रीय एकात्मता बळकट करण्याचे कार्य त्यांनी केले. राष्ट्रहितासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या व्यक्तीलाच लोकमान्य टिळक यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे उचित असून अजित डोवाल हे त्या परंपरेला साजेसे व्यक्तिमत्त्व असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

### युवकांनी समर्पण, त्याग आणि कर्तव्यभावनेने विकसित भारताच्या उभारणीत सहभागी व्हावे- अजित डोवाल

पुरस्कार स्वीकारल्यानंतर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी लोकमान्य टिळकांचे राष्ट्रवाद, स्वातंत्र्य, समाजजागृती आणि विचारप्रबोधनाचे कार्य आजही तितकेच प्रेरणादायी असल्याचे सांगितले. हा पुरस्कार स्वीकारणे हा आपल्या आयुष्यातील मोठा सन्मान असल्याची भावना व्यक्त करत त्यांनी विकसित, आत्मनिर्भर आणि शक्तिशाली भारताच्या निर्मितीसाठी लोकमान्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले.

स्वातंत्र्य ही सहज मिळालेली देणगी नसून असंख्य स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग आणि बलिदानातून प्राप्त झालेली अमूल्य संपत्ती असल्याचे सांगत त्यांनी स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे हा संदेश आजच्या काळात विकसित भारताच्या राष्ट्रीय संकल्पात रूपांतरित करण्याची गरज व्यक्त केली. राष्ट्रहित हे सर्वांत सर्वोच्च मानून प्रत्येक नागरिकाने राष्ट्रनिर्माणात योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. युवकांनी लोकमान्य टिळकांचे विचार आणि 'गीतारहस्य'चा अभ्यास करून समर्पण, त्याग आणि कर्तव्यभावनेने विकसित भारताच्या उभारणीत सहभागी व्हावे, असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकमान्य टिळकांनी दिलेला स्वराज्याचा विचार आज राष्ट्रीय सुरक्षेच्या बळकटीत अधिक प्रभावीपणे प्रतिबिंबित होत असल्याचे सांगितले. देशाच्या सीमा, अंतर्गत सुरक्षा आणि गुप्तचर व्यवस्थेला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळवून देण्यात अजित डोवाल यांचे योगदान अतुलनीय असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांना मिळालेला पुरस्कार देशाच्या सुरक्षा यंत्रणा, सशस्त्र दल आणि राष्ट्रसेवेला वाहिलेल्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान असल्याचे श्री. शिंदे म्हणाले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराची गौरवशाली परंपरा राष्ट्रभक्ती, साहस, दूरदृष्टी आणि कर्तव्यनिष्ठेचा गौरव करणारी असल्याचे सांगितले. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना प्रदान करण्यात आलेला हा पुरस्कार केवळ एका व्यक्तीचा नसून देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेचाही सन्मान असल्याचे त्यांनी नमूद केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने जागतिक स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली असून गृहमंत्री अमित शाह आणि अजित डोवाल यांच्या योगदानामुळे देशाची अंतर्गत सुरक्षा, सीमासुरक्षा आणि दहशतवादविरोधी यंत्रणा अधिक सक्षम झाली आहे. भारतीय पोलीस सेवा, गुप्तचर व्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून विविध आव्हानात्मक परिस्थितीत प्रभावी नेतृत्व करत अजित डोवाल यांनी राष्ट्रसेवेत दिलेले योगदान देशासाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी सांगितले.

डॉ.रोहित टिळक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. १९८६ मध्ये लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराला सुरुवात करण्यात आली असून राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा विविध क्षेत्रातील व्यक्तींना त्यांच्या कार्यासाठी हा पुरस्कार देण्यात येतो. श्री.डोवाल यांना देशाच्या सुरक्षिततेसाठी केलेल्या बहुमूल्य योगदानासाठी हा पुरस्कार देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# अण्णा भाऊ साठे समाजभूषण पुरस्काराने माजी मंत्री दिलीप कांबळे व आमदार अमित गोरखे सन्मानीत



**पुणे :** पुणे शहर जिल्हा मातंग समाजाच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठित असा लोकशाहीर अण्णा भाऊ साठे समाजभूषण पुरस्कार समाजासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल माजी मंत्री दिलीप कांबळे तर समाजामध्ये शैक्षणिक व समाज जागृती मध्ये उल्लेखनीय योगदान असणारे युवा आमदार अमित गोरखे यांना नुकताच प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार आमदार सुनील कांबळे, पुणे शहर मातंग समाजाचे स्वागताध्यक्ष अनिल हातागळे, सचिव अॅड.महेश सकट, समाजाचे जेष्ठ मार्गदर्शक एकनाथ सुगावकर, नगरसेविका मृणाल कांबळे, वृशाली रिठे, माजी नगरसेवक आंनद रिठे, बापू कांबळे, डॉ.भरत वैरागे, स्वाती लोखंडे तसेच अशोक लोखंडे, प्रकाश वैराळ, रवि आरडे, निलेश वाघमारे, दत्ता जाधव, सचिन जोगदंड, राजू अडागळे, रामभाऊ कसबे यासह मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल श्रीफळ असे होते.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित साहित्यसम्राट लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात आणि मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. विविध सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना यावेळी पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

यावर्षी माजी राज्यमंत्री दिलीप कांबळे आणि विधान परिषद सदस्य अमित गोरखे यांना लोकशाहीर अण्णा भाऊ साठे समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच वीर लढवय्या फकीरा पुरस्कार दुर्गेश हातागळे व दिगंबर जोगदंड यांना, तर सत्यशोधक मुक्ता साळवे पुरस्कार कोमल शिंदे यांना प्रदान करण्यात आला.

स्वारगेट येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा परिसरात भव्य सभा मंडपात झालेल्या या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, मातंग समाजाचे पदाधिकारी, महिला आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक कार्य आणि समतेच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले. त्यांच्या विचारांवर आधारित समाजकार्य अधिक व्यापक करण्याची गरज असल्याचेही यावेळी वक्त्यांनी नमूद केले.

पुणे शहर जिल्हा मातंग समाजाच्या वतीने आयोजित या सोहळ्याचे नियोजन आणि संयोजन उत्कृष्टरीत्या करण्यात आले. पुरस्कारप्राप्त मान्यवरांचे उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात अभिनंदन केले. कार्यक्रमामुळे अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा जागर आणि समाजातील कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



भारताचे गृहमंत्री मा.ना.अमितभाई शहा यांनी साहित्यसम्राट लोकशाहीर डॉ.अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन केले. याप्रसंगी पुणे शहर जिल्हा मातंग समाजाच्या वतीने स्वागत करण्यात आले.